श्री. रामदास चव्हाण, अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नाव व पत्ता :-समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे-५
दूरध्वनी क्रमांक :- २५५०१२८६
कार्यालयीन वेळ :- स.९.४५ ते ६.१५
खात्याचा ई-मेल :- sdd@punecorporation.org
जावक क्र.- सविवि/ 677
दिनांक - 18/6/2026.

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.
अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. ५/२०२६
ऑन लाईन अपिल क्र. PUMCO/A/2026/60188

अपिलार्थी नांव व पत्ता :-
श्री. अभिषेक सुभाष हरीदास
रा. राहुल नगर , कोथरूड,पुणे
मो.नं. 8668493599

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
श्री. असंग पाटील,
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

श्री. अभिषेक सुभाष हरीदास --- अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी ऑन लाईन अर्ज क्र. PUMCO/R/2025/60506 दिनांक १२/३/२०२६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक	माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक	अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
१६/३/२०२६	१५/४/२०२६	०६/०५/२०२६	-	-

Scanned with OKEN Scanner

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक १२/३/२०२६ रोजीच्या अर्जाप्रमाणे मागीतलेली संपूर्ण माहिती दिली नाही अपूर्ण माहिती दिली असल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

प्रथम अपील अर्जाचा तपशील				
प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ?	प्रथम अपिलाच्या विलंबाबावत निवेदन दिले आहे का ?	प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक
५/६/२०२६	८/५/२०२६	होय	लागू नाही	१४/५/२०२६

<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u> दिनांक ८/६/२०२६, सकाळी ११.३० वाजता.

<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक ८/६/२०२६रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: उपस्थित होते.

<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक ८/६/२०२६ रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-

अ.क्र.	अर्जदाराने मागितलेली माहिती	जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती
1	समाज विकास विभाग पुणे मनपा राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना बाबत काढ्यात आलेले टेंडर निवड प्रक्रिया, खर्चाची सर्व विले, आदेश, कार्यक्रमाचे फोटो झालेला खर्चाची विले व सर्व कागदपत्रे	श्री.अभिषेक सुभाष हरीदास यांचा ऑन लाईन अर्ज क्र. PUMCO/2026/60506 अर्ज समाज विकास विभागाकडे प्राप्त झाला आहे. सदर अर्जान्वये अर्जदार यांनी मागणी केले नुसार माहिती खालील प्रमाणे सादर करीता आहे. मा. स्थायी समिती ठराव क्र. १८०५ दि. २६/२/२०२६ मधील उप सुचनेनुसार राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना १५ क्षेत्रिय कार्यालयामध्ये राबविणेत यावी याकरीता १५ क्षेत्रिय कार्यालयांना समान निधी पाठवून द्यावा. दि. ८ मार्च ते दि. १४ मार्च क्षेत्रिय कार्यालय स्तरावर कार्यक्रम घेणेत यावे. सदर ठरावान्वये समाज विकास विभागाने क्षेत्रिय कार्यालयांना समान निधी उपलब्ध करून राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना राबविणेबावत कळविले आहे. सदर ठरावाची प्रत सोबत जोडत आहे.

Scanned with OKEN Scanner

"विवेचन"

सदर बाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागीतलेली संपूर्ण माहिती दिली नाही अपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थी यांनी अपिल क्र. PUMCO/A/2026/60188 दि. ८/५/२०२६ रोजी प्रथम अपिल दाखल केले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सादर करणेत आलेल्या दोन अर्जांमध्ये एकच माहितीची मागणी केली असता देणेत आलेल्या माहितीमध्ये विसंगती का आहे. तसेच दिलेली माहिती अपूर्ण असून अत्यावश्यक कागदपत्रे हेतुपुरस्सर वगळणेत आली असलेबाबत सांगितले आहे.

"आदेश"

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती अपिलार्थी यांना देणेत आलेली नाही ती त्वरीत उपलब्ध करून द्यावी सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाल्याने अपिल निरस्त करणेत येत आहे.

(रामदास [illegible])
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.
टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
४)श्री. अभिषेक सुभाष हरीदास , रा. राहुल नगर , कोथरूड,पुणे मो.नं. 8668493599

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी

Scanned with OKEN Scanner